दिनांक १३ ते १७ मार्च, २०१८ या कालावधीत चंदिगढ येथे आयोजित अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा (२०१७-१८) मध्ये महाराष्ट्राचा संघ सहभागी होण्यासाठी होणाऱ्या खर्चास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक- अभानासे- ३८१८ /प्र.क्र.१८/क्रीयुसे-२,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- १२ मार्च, २०१८.

वाचा :- (१) केंद्रीय नागरी सेवा, सांस्कृतिक कार्य आणि क्रीडा मंडळ यांचे पत्र क्रमांक- ५९/०२/२०१७-१८ /सीसीएससीएसबी; दिनांक ३०.०१.२०१८.
(२) सचिवालय जिमखान्याचे पत्र क्र.-अभानासे/ कुस्ती /२०१७-१८, दि.२१.०२.२०१८.
(३) उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्रमांक-उपसंक्री/अभानासे/ १७-१८/का-४/५१७, दि.०१.०३.२०१८.

: शासन निर्णय:

दिनांक १३ ते १७ मार्च, २०१८ या कालावधीत कुस्ती कोचींग सेंटर, चंदिगढ येथे आयोजित करण्यात आलेल्या **अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०१७-१८** मध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा संघ निवडण्याकरिता शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे दि. २०.०२.२०१८ रोजी निवड चाचणी आयोजित करण्यात आली होती. या चाचणीमध्ये सहभागी झालेल्या २० अधिकारी व कर्मचा-यांची यादी सोबतच्या विवरणपत्र "क" प्रमाणे तर निवड चाचणीद्वारे निवडण्यात आलेला राज्याचा संघ विवरणपत्र "अ" प्रमाणे आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी, प्रशिक्षण शिबीर तसेच राज्य संघाच्या सदर स्पर्धेतील सहभागासाठी विवरणपत्र "ब" प्रमाणे **रु.५७,३००/-(रुपये सत्तावन्न हजार तीनशे फक्त फक्त**) इतक्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना सदर रक्कम आहरीत करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. संघातील ज्या खेळाडूंना किट बॅग्ज व ट्रॅकसूट मिळालेले आहेत ते खेळाडू कोणत्याही अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेसाठी किटबॅग व ट्रॅकसूट दोन वर्षातून एकदा मिळण्यास पात्र ठरतील. या नियमाचे सचिवालय जिमखान्याने काटेकोरपणे पालन करावे.

४. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी संबंधित विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख यांनी खेळाडू प्रशिक्षक / व्यवस्थापक यांना दिनांक ०७.०२.२०१८ (म.नं.) पासून कार्यमुक्त करावे. तसेच या खेळाडूंनी दि.०८.०३.२०१८ ते १०.०३.२०१८ या कालावधीतील प्रशिक्षण शिबिरासाठी शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे उपस्थित रहावेत. सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खेळाडूंना दि.११.०३.२०१८ रोजी मुख्यालय सोडण्यास परवानगी देण्यात यावी. तसेच खेळाडूंनी दिनांक १३.०३.२०१८ ते १७.०३.२०१८ या कालावधीतील स्पर्धेत उपस्थित राहावे. संघातील प्रत्येक खेळाडूने व व्यवस्थापकाने ते ज्यांच्या अधिपत्याखाली काम करीत असतील त्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांची परवानगी मिळविणे आवश्यक आहे.

५. संघातील खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांची प्रशिक्षण शिबीर व स्पर्धा काळातील कार्यालयीन अनुपस्थिती ही शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/ अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै, १९९२ अन्वये "कर्तव्य कालावधी" म्हणून समजण्यात यावा. तसेच स्पर्धा संपल्यानंतर एक दिवसानंतर खेळाडूंनी मुख्यालयास परत यावे. या सर्वाचा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व इतर भत्ते यावर होणारा खर्च संबंधित विभागाच्या / कार्यालय प्रमुखांच्या मुख्य लेखाशिर्षाखाली असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. स्पर्धेच्या निवड चाचणीसाठी उपस्थित अधिकारी / कर्मचारी (विवरणपत्र-क) यांची कार्यालयीन अनुपस्थिती शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-एलव्हीई/१४९२/४६/सेवा-९, दिनांक ३० जुलै,१९९२ अन्वये कर्तव्यार्थ म्हणून समजण्यात यावी व मुंबई बाहेरील खेळाडूंना अनुज्ञेय असलेला प्रवास / दैनिक भत्ता व इतर सवलती या वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक- एलव्हीई-१४८५/प्र.क्र.८३३/अ/सेवा-९, दिनांक ११ मे, १९८९ व वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक-एलव्हीई-१४०४/प्र.क्र.८/अ/सेवा-८, दिनांक २७ फेब्रुवारी, २००४ अन्वये विशेष बाब म्हणून मंजूर करण्यात यावी.

या सवलतीचा लाभ मिळण्यासाठी निवड चाचणीसाठी उपस्थिती असणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत मानद सचिव, सचिवालय जिमखाना यांनी दिलेले प्रमाणपत्र संबंधित कर्मचा-यांनी त्यांच्या आस्थापना कार्यासनाला सादर करणे आवश्यक राहिल.

७. सचिवालय जिमखान्याने प्रत्यक्ष खर्चाचे विवरणपत्र कोणत्याही परिस्थितीत आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे तसेच उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना स्पर्धेत केलेल्या खर्चाच्या अहवालासोबत सादर करावे. तसेच जर रक्कम शिल्लक राहिली तर ती उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई यांना त्वरीत परत करण्यात यावी.

८. यासाठी होणारा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी "२२०४ क्रीडा व युवक सेवा, १०४ क्रीडा व खेळ, (०६) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा, (०६)(०२) अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभाग (२२०४ १९८१), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर)" या लेखाशीर्षाखाली अर्थसंकल्पित तरतूदीतून भागविण्यात यावा.

९. सचिवालय जिमखाना यांच्याकडून स्पर्धेचा अहवाल, बाबनिहाय प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तपशील, विनियोग प्रमाणपत्र, परिक्षित लेखा विवरणपत्र व मंजूरी आदेशातील सर्व अटींची पूर्तता करण्याच्या अटीवर विवरणपत्र "ब" प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१६१६५१४८४०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:52:41 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, क्रीडा व युवकसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, पुणे विभाग, पुणे

३. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, मुंबई विभाग, मुंबई,

४. जिल्हा क्रीडा अधिकारी, मुंबई.

५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-४०० ०२१.

६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

७. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,

८. वित्त विभाग (व्यय-११), मंत्रालय, मुंबई.

९. मानद महासचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई-४०० ०३२ (५ प्रती)

१०. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचे कार्यालये (सचिवालय जिमखान्यामार्फत)

११. निवड नस्ती (क्रीयुसे-२).

<u>विवरणपत्र “अ”</u>

दिनांक १३ ते १७ मार्च, २०१८ या कालावधीत चंदिगढ येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०१७-१८ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या कुस्ती संघाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या स्पर्धकांची नावे दर्शविणारे विवरणपत्र.

क्र.	खेळाडूचे नाव व पदनाम	ट्रॅकसूट	किटबॅग	विभाग / कार्यालय
१	पै. रमेश तोतेवाड, लिपिक	होय	होय	प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे, जिल्हा- पुणे.
२	पै. सुभाष चं. ढोणे, तलाठी	होय	होय	तहसिल कार्यालय, कल्याण, जिल्हा- ठाणे
३	पै. लक्ष्मण य. पाटील, कर सहायक	होय	होय	वस्तू व सेवा कर (विक्रीकर) कार्यालय, माझगांव, मुंबई.
४	पै. महेश तात्याराव घुले, लिपीक टंकलेखक	होय	होय	प्रादेशिक परिवहन कार्यालय, जिल्हा- पुणे.
५	पै. शंभू म. कन्हेर, तलाठी	होय	होय	तहसिल कार्यालय, शिराळा, जिल्हा सांगली.
६	पै. भरतरीनाथ जा. गोफणे, विक्रीकर निरिक्षक	होय	होय	कॅबीन नं. २०८, २रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, जिल्हा- पुणे.
७	श्री. पांडुरंग पाटील, निरिक्षक	होय	होय	अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर, जिल्हा- कोल्हापूर.
८	पै. सुभाष पाडेकर, बाह्यसेवक	होय	होय	ग्रामीण रुग्णालय, पन्हाळा,ता. पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर.
९	पै. हनुमंत मा. खरात, लिपिक	नाही	नाही	वनपरिक्षेत्र अधिकारी तानसा अभयारण्य, तानसा, शहापूर, जिल्हा-ठाणे.
१०	पै. अरुण पाटील, क्रीडाधिकारी	होय	होय	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे.
११	श्री. दिपक ना. पाटील, कनिष्ठ लिपिक प्रशिक्षक	होय	होय	शासकीय तंत्र निकेतन, विद्यानगर, कराड, जिल्हा- सातारा.
१२	श्री. पद्माकर गांगवे व्यवस्थापक	होय	होय	उपसंचालक, पुरवठा आयुक्त कार्यालय, कॉटनग्रीन, मुंबई - ४०० ०३३

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca28 0267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:53:37 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

विवरणपत्र “ब”

दिनांक १३ ते १७ मार्च, २०१८ या कालावधीत चंदिगढ येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०१७-१८ महाराष्ट्र शासनाच्या कुस्ती संघासाठी होणाऱ्या खर्चाचे विवरणपत्र.

क्र.	खर्चाचा तपशिल	रुपये
१)	**निवड चाचणी तयारीसाठी झालेला खर्च.**	५००/-
२)	निवड चाचणी- पंचाचे मानधन.	२,०००/-
३)	खेळाडू, अधिकारी यांना चहा/अल्पोपहार यावरील खर्च.	१,५००/-
४)	प्रथमोपचार खर्च.	५००/-
५)	प्रवास खर्च (निवड चाचणीकरीता)	१,८००/-
ब)	**प्रशिक्षण शिबीराकरिता खर्च.**	
१	खेळाडू, व्यवस्थापक, प्रशिक्षण यांचे करिता खुराक यावरील खर्च. (१२x२००x३)	२,०००/-
२)	पंचाचे मानधन व प्रवास खर्च.	१,०००/-
úक)	**संघासाठी वैयक्तिक क्रीडा साहित्य :-**	
१	११ ट्रॅकसूट रु.८००/- प्रमाणे	७,७००/-
२	११ किटबॅग प्रत्येकी रु. ५००/- प्रमाणे.	५,५००/-
४	११ कॉश्च्युम रु. १६००/- प्रमाणे (डबल कलर) लाल व निळा (गरजेचे आहे)	१७,६००/-
५	१० सपोटर प्रत्येकी रु. ३००/- प्रमाणे.	३,०००/-
६	१० रिस्टबॅण्ड रु. १००/- प्रमाणे.	१,०००/-
७	१० निकॅप प्रति रु. २००/- प्रमाणे.	२,०००/-
८	११ बूटांचे जोड प्रत्येकी रु. ७००/- प्रमाणे (मॅटवरील कुस्तीकरीता)	७,७००/-
९	१२ जोडी पायमोजे प्रत्येकी रु. ७५/- प्रमाणे.	९००/-
१०	११ टॉवेल्स प्रत्येकी रु.१००/- प्रमाणे (टॉवेल गरजेचे आहे).	१,१००/-
११	प्रथमोपचार	१,०००/-
ड)	**संकीर्ण खर्च.**	५००/-
	एकूण रुपये : सत्तावन्न हजार तीनशे पन्नास फक्त	**५७,३००/-**

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca2802 67c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:54:42 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

<u>विवरणपत्र - क</u>

दिनांक १३ ते १७ मार्च, २०१८ या कालावधीत चंदिगढ येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०१७-१८ मध्ये भाग घेणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या कुस्ती संघाची निवड करण्यासाठी दि. २० फेब्रुवारी, २०१८ रोजी निवड चाचणीसाठी उपस्थित राहिलेले अधिकारी कर्मचारी खेळाडूंची नावे विवरणपत्र.

क्र.	**खेळाडूचे नाव व पदनाम**	**विभाग / कार्यालय**
१	पै. रमेश तोतेवाड, लिपिक	प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे, जिल्हा- पुणे.
२	पै. सुभाष चं. ढोणे, तलाठी	तहसिल कार्यालय, कल्याण, जिल्हा- ठाणे.
३	पै. लक्ष्मण य. पाटील, कर सहायक	वस्तू व सेवा कर (विक्रीकर) कार्यालय, माझगांव, मुंबई.
४	पै. महेश तात्याराव घुले, लिपीक टंकलेखक	प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे, जिल्हा- पुणे.
५	पै. शंभू म. कन्हेर, तलाठी	तहसिल कार्यालय, शिराळा, जिल्हा सांगली.
६	पै. भरतरीनाथ जा. गोफणे, विक्रीकर निरिक्षक	कॅबीन नं. २०८, २रा मजला, विक्रीकर भवन, येरवडा, जिल्हा- पुणे.
७	श्री. पांडुरंग पाटील, निरिक्षक	अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कोल्हापूर, जिल्हा- कोल्हापूर.
८	पै. सुभाष पाडेकर, बाह्यसेवक	ग्रामीण रुग्णालय, पन्हाळा,ता. पन्हाळा, जिल्हा- कोल्हापूर.
९	पै. हनुमंत मा. खरात, लिपिक	वनपरिक्षेत्र अधिकारी तानसा अभयारण्य, तानसा, शहापूर, जिल्हा-ठाणे.
१०	पै. अरुण पाटील, क्रीडाधिकारी	आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, जिल्हा- पुणे.
११	पै. दिपक ना. पाटील, कनिष्ठ लिपिक	शासकीय तंत्र निकेतन, विद्यानगर, कराड, जिल्हा- सातारा.
१२	पै. गजानन गं. देगलूरे, वनरक्षक	उपवन संरक्षक, अलिबाग वन विभाग, मु.पो.ता. अलिबाग, जिल्हा- रायगड.
१३	पै. रुक्मांगद चं. यमगर, वनरक्षक	संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली, मुंबई.
१४	पै. आनंदा चं. खाने, वनरक्षक	उपवन संरक्षक, अलिबाग वन विभाग, मु.पो.ता. अलिबाग, जिल्हा- रायगड.
१५	पै. संतोष रा. लालगे, कृषि पर्यवेक्षक	तालुका कृषि अधिकारी, आष्टी, ता. आष्टी, जिल्हा - बीड
१६	पै. राहुल ग. पाटील, कर सहायक	वस्तू व सेवाकर (विक्रीकर) कार्यालय, माझगांव, मुंबई.
१७	पै. गणेश महादेव मानमोठे, वनरक्षक	वन विभाग कार्यालय, रोहा रेंज, जिल्हा- रायगड.
१८	पै. संतोष दादाराव बेले, कृषी सहायक	तालुका कृषी अधिकारी कार्यालय, दिग्रस, जिल्हा - यवतमाळ
१९	श्री. सतीश सोनवाने, सहा. कक्ष अधिकारी	जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०	श्री. प्रकाश चौधरी,	सह सचिव, सचिवालय जिमखाना, मुंबई.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2018.03.16 16:56:02 +05'30'

(राजेंद्र पवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन